मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

संपादक : तुषार गायकवाड

कार्यकारी संपादिका रुबिना मुल्ला :9890879757

RNI No. MAHMAR/2016/72543

वर्ष ६वे | अंक : ०२ | रविवार,दि.१४ एप्रिल ते शनिवार २० एप्रिल २०२४ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ — संपादकीय — डॉ. आंबेडकरांच्या समीक्षेचे...

पान ३ — जाहिरात

पान ४ — जाहिरात

## डहाणू मधील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुका प्रमुख यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा लोकनेते हितेंद्रजी ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत बहुजन विकास आघाडी मध्ये जाहीर प्रवेश..



आज डहाणू शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे डहाणू तालुका प्रमुख श्री अशोक भोईर यांनी त्यांच्या शेकडो समर्थकांसह बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा लोकनेते हितेंद्रजी ठाकूर आणि वसई विरारशहर महानगर पालिकेचे प्रथम महापौर राजीव पाटील नाना कार्यध्यक्ष बवीआ यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश केला.हा प्रवेश मी बहुजन विकास आघाडीचे आमदार राजेश पाटील,आमदार क्षितीज ठाकूर आणि आप्पा यांच्या कार्यपद्धतीवर प्रेरित होऊन केला असल्याचे अशोक भोईर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. यावेळी अशोक भोईर यांची बहुजन विकास आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी,तर अभिजित देसक यांची जिल्हा युवा उपाध्यक्ष आदिवासी सेल,तसेच सुरेश पाडवी यांची पालघर विधानसभा अध्यक्ष पदी नेमणूक करण्यात आली. यावेळी त्यांच्या समवेत चांदू धांगडा ,चांदू करमोडा,सुनिल गांगडे,जयवंत का, सुदाम धांगडा, लहानु भोवर,राहुल बालोडा,राहुल बसवत,अजय धडपा,अशोक वाडिया यांच्या सह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटाच्या शेकडो कार्यकर्त्यांचा मोठ्या उत्साहात आज बहुजन विकास आघाडी मध्ये स्वागत करण्यात आले.यावेळी बहुजन विकास आघाडीचे उपाध्यक्ष संतोष बुकले,डहाणू तालुका अध्यक्ष अरुण निकोले,बहुजन विकास आघाडी आदिवासी सेल युवा जिल्हाध्यक्ष प्रसाद पऱ्हाड,माजी जी प सदस्या मलावकर मॅडम,रणधीर कांबळे,



आंबेडकर नगर स्थानिक बौध्दजन मंडळ चे अध्यक्ष मा.आयु.किशोर काकडे प.पु.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर विनम्र अभिवादन करताना छायाचित्रात दिसत आहे.






# संपादकीय...!

## डॉ. आंबेडकरांच्या समीक्षेचे मोल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली समीक्षा आजही महत्त्वाचीच आहे; कारण ती मुख्यतः ब्राह्मण्याच्या वा नव्या सांस्कृतिक स्वरूपात पुढे येणाऱ्या इतर कोणत्याही वर्चस्वाचा विरोध करते, आणि त्यायोगे समतेच्या मूल्यांचा पुरस्कार करून लोकशाही समाजाची पायाभरणी करते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने ही बाब अधोरेखित करणारा हा लेख...डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या प्रश्नांसाठी लढा उभारला ते शोषणाचे, जात-वास्तवाचे, जीवनाच्या दर्जाचे, ब्राह्मणी संस्कृतीच्या वरचष्म्याचे अनेक प्रश्न आजही तितकेच संवेदनशील आणि समस्याग्रस्त आहेत. त्यांच्या जोडीला माध्यमांचे, बाजारशक्तीचे, सत्तेच्या बदललेल्या रूपांचे नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. संस्कृतीच्या 'मुख्य धारे'मध्ये समावेश किंवा निष्कासन या रूपात आपण विषमतेचा नवा आविष्कार बघत आहोत. विशेषतः सन १९९०नंतर संस्कृतीचे गौरवीकरण आणि साधनीकरण करणारे राजकारण निर्माण झालेले आपण पाहत आहोत. त्याच्या पुढे सांस्कृतिक कर्मकांडाला सत्तेच्या राजकारणात मिळालेले महत्त्व, हिंदुत्ववादी विचारसरणीने खुद्द आंबेडकरांच्या बुद्धिवादी विचारांना स्वतःमध्ये सामील करण्याचा केलेला प्रयत्न, आणि आता भारतीय लोकशाहीचे अस्तित्व संविधानात्मक स्वरूपात टिकण्याविषयी नव्याने निर्माण झालेली शंका, ही नवी आव्हाने आता दिसत आहेत. या आपल्या आजच्या समस्या आहेत. त्यांच्या निराकरणासाठी आणि न्यायाधारित समाजाच्या उभारणीच्या ध्येयाकडे जाण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या विचारव्यूहाला आणि कृतींना नव्या संदर्भात समजून घेणे गरजेचे आहे.हा नवा संदर्भ त्यांनी केलेल्या चिकित्सेचे स्वरूप ओळखण्याचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच महात्मा फुले या दोघांनी केलेली जात-वर्ण आधारित सत्ता-संबंधांची चिकित्सा वैशिष्ट्यपूर्ण आहे; कारण ती वंचितांच्या बाजूने, बुद्धिवादी तर्काने आणि सामाजिक न्यायाचा विचार करून केलेली आहे. त्यात दैनंदिन जीवनाचा विचार ठळक आहे. संस्कृतीच्या मार्गाने होणाऱ्या शोषणाविषयीचा विचार आहे. मान्यताप्राप्त ज्ञान (धार्मिक अधिकार) आणि सत्तासंबंध यांचे नाते काय असते ते शोधण्याचा प्रयत्न आहे, आणि मुख्यत्वे त्याद्वारे जनजागृती करून राजकीय हस्तक्षेप करण्याचा हेतू आहे. अशा गुणांनी युक्त असणाऱ्या चिकित्सेला आज अकादमिक चर्चाविश्वात 'सांस्कृतिक अभ्यास' असे नाव मिळाले आहे. डॉ. आंबेडकर आणि महात्मा फुले या दोघांकडे असणारी ही 'अनुभवाच्या चिकित्सेतून ज्ञाननिर्मिती होण्याची प्रक्रिया' आजच्या सांस्कृतिक समीक्षेच्या विचारासाठी फार महत्त्वाची आहे. म्हणून, चिकित्सक वृत्ती बाळगण्याला मनुष्यत्वाचे पहिले लक्षण मानणाऱ्या डॉ. आंबेडकरांना, तसेच महात्मा फुले यांना सांस्कृतिक समीक्षकांच्या रूपात जाणून घेणे आज शक्य आहे.डॉ. आंबेडकरांची सांस्कृतिक समीक्षा कृतिप्रवण होती, हे महत्त्वाचे आहे. त्यांचे राजकीय कृतींचे निणर्य सांस्कृतिक परंपरा आणि दबावांना झुगारून घेतलेले दिसतात. दलितांना राजकीय ओळख मिळवून देणे ही कृती वर्णाश्रम धर्माने दिलेल्या ओळखीच्या अवकाशातून बाहेर पडण्याचा प्रयत्न होता. धर्मांतर करण्याचा त्यांचा निणर्य म्हणजे धर्माविरुद्ध केलेले बंड होते. नवनिर्वाचित भारताच्या राज्यघटनेमध्ये एक मनुष्य, एक मत, एक दर्जा हे तत्व अंतर्निहित करण्यामध्ये पारंपरिक सत्तेच्या उतरंडीपेक्षा व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनाला महत्त्व दिलेले होते.डॉ. आंबेडकर यांचे लाहोरच्या जात-पात तोडक मंडळासाठी तयार केलेले, परंतु प्रत्यक्षात न दिलेले सन १९३६मधील भाषण (हहर्ग्र्ीूदह द र्ीूं) त्यांच्या सांस्कृतिक समीक्षेचे उत्तम उदाहरण प्रस्तुत करते. आधुनिकता पूर्णपणे स्वीकारायची असेल तर प्राचीन धर्माधारित कुटुंबव्यवस्थेचा आदर्श बाळगून उपयोग नाही, तिथे व्यक्तीचे जीवन मूलभूत मानले पाहिजे, याविषयी त्यांच्या मनात काहीही गोंधळ नव्हता. जात आणि वर्णांना मिळालेली धार्मिक मान्यता, म्हणजेच शास्त्रांना मिळालेले अधिकाराचे स्थान नष्ट झाल्याखेरीज हिंदू समाज स्वातंत्र्य, बंधुता आणि समतेच्या आधारावर बांधला जाऊ शकत नाही, हे त्यांचे ठाम प्रतिपादन आहे. महात्मा गांधींनी हरिजन पत्रामध्ये तीन वेळा लेख लिहून (११ जुलै, १८ जुलै आणि १५ ऑगस्ट १९३६) डॉ. आंबेडकरांच्या या छापील भाषणाचा उहापोह केला. त्याला डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या उत्तरात जातीच्या उतरंडीमध्ये मालक आणि गुलाम असा सत्तासंबंध अनिवार्यपणे कसा तयार होतो, कामाच्या किंवा इतर क्षेत्रांत वंशपरंपरा पाळणे नव्या युगात कसे अशक्य आणि नैतिकदृष्ट्या असमर्थनीय आहे, असा अभिप्राय नोंदवला आहे. या विश्लेषणात डॉ. आंबेडकरांनी अत्यंत सूक्ष्मपणे असेही नोंदवले आहे की, त्यांचे भांडण हिंदू धर्मातल्या सामाजिक वर्तनाच्या अपरिपूर्णतेशी नाही, तर मुळात ते धर्मांतर्गत आदर्शांशी आहे.सुराज्य आणि स्वराज्य यांच्यातला फरक आंबेडकरांना नीट माहीत होता. गांधीजींच्या हरिजन संज्ञेतला, इतरांचे हृदयपरिवर्तन होईस्तोवर वाट पाहण्याच्या सल्ल्यातला दुबळेपणा ओळखत त्यांनी निव्वळ स्वराज्याच्या कल्पनेने हुरळून जाणे नाकारले. उच्चजात-वर्णीय लोक स्वातंत्र्य मिळाल्यावर अस्पृश्यांच्या बाजूने उभे राहतील असे त्यांना वाटत नव्हते; तसे अनेक अनुभव त्यांनी पचवले होते. त्यामुळे स्वतंत्र भारतात अस्पृश्यता पाळणे हा शिक्षापात्र गुन्हा करावा, असे त्याचे मत होते. गावागावांतून खोलवर रुजलेल्या जातीभेदाची त्यांना उत्तम कल्पना असल्याने, त्यांनी स्वतः नेतृत्व करून घटना तयार केलेली असली तरी घटनेतील काही तरतुदी प्रत्यक्षात कशा उपयुक्त ठरतील, याविषयी ते साशंक होते. ग्रामपंचायतीसंबंधीच्या कलमाविषयी संसदेत बोलतांना जातवास्तवाबद्दलतेच्या अनभिज्ञतेतून ग्रामीण जीवनाचे उदात्तीकरण काही शहरी विचारवंतांनी केले. त्यांच्या दृष्टिकोनांची आंबेडकरांनी टर उडवल्याचा जो उल्लेख य. दि. फडक्यांनी केला आहे त्याकडे आंबेडकरांच्या स्वराज्य आणि सुराज्यासंदर्भातल्या चिकित्सकपणाचा एक नमुना म्हणून बघता येईल.जातीची संकल्पना बंदिस्त वर्णवर्ग दर्शवते, असे प्रतिपादन डॉ. आंबेडकरांनी केले होते. भिन्न भिन्न प्रकारचे गुण असणारी माणसे काटेकोरपणे आखलेल्या चार वर्णांत कशी बसतील? चातुर्वर्ण्य व्यवस्थेमध्ये स्त्रियांना कोणता दर्जा द्यायचा - नवऱ्याचा आहे तो की स्वतंत्र? असे प्रश्न त्यांनी विचारले. ही व्यवस्था सर्वांना ज्ञान मिळवण्याचा हक्क देत नाही, तशीच स्वसंरक्षणासाठी शस्त्रे घेण्याचीसुद्धा परवानगी देत नाही, असे अर्थनिवेदन त्यांनी चार वर्णांच्या उतरंडीचे केले. जात या संकल्पनेच्या अभ्यासपूर्ण आकलनात इतर समाजशास्त्रज्ञांच्या तुलनेत डॉ. आंबेडकरांनी मांडलेला मुद्दा अजूनही महत्त्वाचा आहे, तो म्हणजे व्यक्तीची ओळख विरुद्ध जातींचे उतरंडीचे स्वरूप. यातल्या कशाला आपण महत्व द्यायला हवे?डॉ. आंबेडकरांच्या जातव्यवस्थेच्या विश्लेषणाचे महत्त्व असे की, त्यामुळे जातिआधारित विषमता ही निव्वळ धार्मिक, किंवा समाजशास्त्रीय बाब नसून ती अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, आणि भारतीय संस्कृती अशा विविध क्षेत्रांत परिणाम करणारी निहित बाब आहे, हे ठळकपणे समोर आले. या वैचारिक सुस्पष्टतेमुळे त्यांच्या कार्यकाळात आणि पश्चातही, भारतातल्या सामाजिक संघर्षाची ठोस जडणघडण झाली. सुराज्यासाठी कोणती सामाजिक उद्दिष्टे एक देश अथवा राष्ट्र म्हणून गाठणे आवश्यक आहे, याविषयी स्पष्टता आली. तशीच त्यांनी राज्यघटनेच्या तात्विक मांडणीमध्ये सामाजिक न्यायाच्या तत्वाला जी अधिकृत आणि प्रमुख जागा मिळवून दिली, तिच्या प्रकाशात स्वतंत्र भारतातील अनेक क्लिष्ट प्रश्नांची सोडवणूक अजूनही होत असताना दिसते. त्यातून लोकशाहीचा खरा अर्थ दृग्गोचर होतो आहे. वैयक्तिक अनुभव, चिंतन, सिद्धांतन, विचारसरणी असा त्यांच्या विश्लेषणाचा प्रवास आहे; तो आंबेडकरवादाची मांडणी, स्त्रियांची, दलितांची आणि विद्यार्थ्यांची चळवळ, साहित्य समीक्षा, कलाविष्कार, भाषांतरे, चर्चासत्रे, राजकीय समीकरणे, प्रतिकांच्या लढाया अशा अनेक मार्गांनी आजही चालू आहे.आंबेडकरांनी केलेली समीक्षा आज महत्त्वाची का आहे? कारण ती मुख्यतः ब्राह्मण्याच्या वा नव्या सांस्कृतिक स्वरूपात पुढे येणाऱ्या इतर कोणत्याही वर्चस्वाचा विरोध करते, आणि त्यायोगे समतेच्या मूल्याचा पुरस्कार करून लोकशाही समाजाची पायाभरणी करते. तिचे संदर्भ स्थानिक आहेत, म्हणून उपयुक्त आहेत, प्रेरणादायी आहेत. जातीआधारित विषमता अजूनही नष्ट न झाल्याने या समीक्षेची उपयुक्तता संपलेली नाही. तिचे कार्य राजकीयदृष्ट्या सजग बनवण्याचे आहे. अलीकडच्या तीसेक वर्षांत मध्यमवर्गाने हिंदुत्वाच्या राजकीय विचारसरणीला बळ दिल्याचे ढोबळ मानाने दिसतं. त्याचा एक परिणाम म्हणजे वंचितांना आणखी परिघावर ढकलले जाणं. करोनाच्या साथीत विविध टप्प्यांमध्ये ज्या प्रकारे असंघटित कामगार वर्ग विस्थापित आणि विनाधार झालेला आपण पाहिला, ते याच विषमता आणि बहिष्कृतता तीव्र होण्याच्या गुणधर्माचे एक दृश्य स्वरूप होते. या पार्श्वभूमीवर, फुले आणि आंबेडकरांच्या समीक्षेला सांस्कृतिक समीक्षेच्या रूपात बघितले तर ती वंचितांच्या बाजूने विचार करणारा, सर्वात सशक्त असा परिवर्तनाचा स्वर प्रदान करताना आढळते.

## सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार, अज्ञातांकडून चार राऊंड फायर, घटनेवेळी 'भाईजान' घरातच




सलमान खानच्या घराबाहेर अज्ञातांकडून गोळीबार करण्यात आला आहे. पहाटे ४.५५ मिनिटांनी हा गोळीबार करण्यात आला. अज्ञातांकडून ४ राऊंड फायर करण्यात आल्याची माहिती आहे.मुंबई : बॉलिवूडचा भाईजान अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार झाल्याची खळबळजनक घटना घडल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दोन अज्ञात दुचाकीवरून सलमान खानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटच्या बाहेर आले होते. तेव्हा त्यांनी तिथे ३-४ राऊंड फायर केल्याची माहिती आहे. हा गोळीबार कोणी केला याबाबत सध्या काहीही माहिती नाही.पहाटे ४.५५ वाजता ही घटना घडली. या घटनेनंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. सध्या पोलिस सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत. पोलिसांचा मोठा बंदोबस्त सलमान खानच्या घराबाहेर आहे. पोलिस सलमान खानकडून याबाबतची माहिती घेत आहेत. तसेच, सुरक्षा रक्षक, खाजगी सुरक्षा रक्षकांकडूनही माहिती घेतली जात आहे. फॉरेन्सिक टीमही याठिकाणी दाखल झालेली आहे.सलमान खानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी निवासस्थानाबाहेर ४ राऊंड फायर करण्यात केल्याची माहिती आहे. हल्लेखोर दुचाकीवर आले आणि त्यांनी हवेत गोळीबार करून तेथून पळ काढला. सध्या या घटनेत कोणीही जखमी झाल्याची माहिती नाही. ही घटना घडली तेव्हा सलमान खान घरीच होता. याआधीही सलमान खानला अनेकदा जीवे मारण्याच्या धमक्या आलेल्या आहेत.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार गोळीबारात अज्ञातांनी ३-४ राउंड फायर केले. मुंबई क्राइम ब्रँच आणि एटीएसची टीम घटनास्थळी पोहोचली आहे.गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईकडून अनेकदा धमकाकुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईने सलमान खानला अनेकदा जीवे मारण्याची धमकी दिली आहे. तसेच, सलमान खानचे वडील सलीम खान यांनाही २०२२ मध्ये घराबाहेर जॉगिंग करताना धमकीची चिठ्ठी देण्यात आली होती. यामध्ये 'मुसेवाला जैसा कर देंगे', असं म्हणत सलमानला मारण्याची धमी देण्यात आली होती. त्यामुळे सलमानच्या सुरक्षेतही वाढ करण्यात आली होती.












१४ एप्रिल
डॉ.बाबासाहेब
आंबेडकर
जयंतीच्या शुभेच्छा
ॲड.संदिप केदारे


राष्ट्रवादी कामगार युनियन
भारतीय
संविधानाचे
शिल्पकार
भारतरत्न
डॉ. बाबासाहेब
आंबेडकर
यांच्या जयंती निमित्त
विनम्र अभिवादन
रमेश भारती
महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष
हरेश कोटकर
वसई विरार जिल्हाध्यक्ष
सुधांशु सिंह
मुंबई महासचिव
सुरज गौंड
जिल्हा महासचिव


१४ एप्रिल
महामानव विश्वरत्न
भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार
भारताचे भाग्य विधाते
डॉ. बाबासाहेब
आंबेडकर
मंगलमय शुभेच्छा
वसीम अहमद शेख
कार्यकारी संपादक-शिवांश न्यूज
तुषार रा.गायकवाड
संपादक-युवाशक्ती एक्सप्रेस


शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा
अनिता गणपत सातपुते
अध्यक्षा-वुमन पॉवर ऑफ इंडीया


सागराचे पाणी कधी आटणार नाही,
भीमरायाची आठवण कधी मिटणार नाही
अरे एकच जन्म काय हजार जन्म घेतले तरी
आपल्याकडून बाबासाहेबांचे
उपकार कधी फिटणार नाही
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना
जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!
डॉ.संदेश वाघ


मन्सुर सरगुरोह
(मालक/संपादक-कोकण सन इंग्रजी)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक-अनिता ग.सातपुते कोकण सन (मराठी संपादिका)






एस. सी, एस.टी बहुजन एम्पलॉईज वेलफेअर असोसिएशन कार्यलयात राष्ट्रीय सल्लागार सतिश बोर्डे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना छायाचित्रात दिसत आहे सोबत सचिव विनित यादव कार्यध्यक्ष प्रमोद भालेराव .
















हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन तुषार पब्लिकेशन में. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.com